क्र. ११७, पहिले वर्ष

२७ नोव्हेंबर २०२२

# रविवारची उपासना

## आगमनकाळातील पहिला रविवार

### प्रस्तावना

आज आपण आगमनकाळात प्रवेश करत आहोत. ख्रिस्ताच्या आगमनाची तयारी करताना ह्या आगमनकाळात आपण मरियेप्रमाणे ख्रिस्ताचा ध्यास धरू या व त्याच्या भेटीसाठी स्वत:ला सत्पात्र बनविण्याचा प्रयत्न करू या. त्यासाठी आजच्या दुसऱ्या वाचनांत संत पौल म्हणतो त्याप्रमाणे, ''अंधकाराची कर्मे टाकून प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करू या.'' व ह्या आगमनकाळात आपण ख्रिस्ताच्या प्रेमाने झपाटून जावे व त्याच्याशी एकरूप व्हावं म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीमध्ये प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**मूक प्रार्थनेसाठी विराम**

हे प्रभो, सर्वसमर्थ परमेश्वरा, आम्हांकडून नेहमी सत्कृत्ये घडू देत म्हणजे ख्रिस्त पुन्हा येईल तेव्हा आमची सत्कृत्ये पाहून आनंदित होईल व स्वर्गराज्यात आम्हांला प्रवेश देईल. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात एकच परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

### पहिले वाचन

**यशयाच्या पुस्तकातून घेतलेले वाचन २:१-५**

**''प्रभू सर्व राष्ट्रांना परमेश्वराच्या चिरशांतीच्या राज्यात एकत्रित करतो।''**

आमोजाचा पुत्र यशया याला यहुदा आणि यरुशलेम याविषयी प्राप्त झालेले दृष्टांतवचन : शेवटल्या दिवसांत असे होईल की, परमेश्वराच्या मंदिराचा पर्वत, पर्वतांच्या शिखरांवर स्थापण्यात येईल आणि सर्व पर्वतांहून तो उंच होईल. त्याकडे सर्व राष्ट्रांतील लोक लोटतील, देशादेशांतील लोकांच्या झुंडी जातील आणि म्हणतील, ''चला, परमेश्वराने आपले मार्ग आम्हांला शिकवावेत आणि आम्ही त्याच्या मार्गाने चालावे म्हणून आपण त्याच्या पर्वताकडे, याकोबाच्या देवाच्या निवासस्थानी जाऊ या।'' कारण सियोनातून धर्मशास्त्र आणि यरुशलेमेतून परमेश्वराचे वचन निघेल. तो राष्ट्रांचा न्यायनिवाडा करील. देशोदेशींच्या लोकांचा न्याय करतील, आणि ते आपल्या तलवारी मोडून त्यांचे फाळ करतील, आपल्या भाल्यांच्या कोयत्या करतील. यापुढे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर तलवार उचलणार नाही. ते यापुढे युध्दकला शिकणार नाहीत. याकोबाच्या घराण्या, चल, ये. आपण परमेश्वराच्या प्रकाशात चालू.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१२१:१-२, ३-४, ८-९**

प्रतिसाद : **''चला, आपण परमेश्वराच्या मंदिरात जाऊ।''**

१. ''चला, आपण परमेश्वराच्या मंदिरात
जाऊ।'' असे ते मला म्हणाले, तेव्हा
मला आनंद झाला. हे यरुशलेमे, तुझ्या
वेशींना आमचे पाय लागले आहेत (प्र.)

२. हे यरुशलेमे, एकत्र जोडलेल्या
नगरीसारखी तू बांधलेली आहेस.
इस्राएलास घालून दिलेल्या निर्बंधाप्रमाणे
तुझ्याकडे वंश, परमेश्वराचे वंश,
परमेश्वराच्या नावाने उपकारस्मरण
करण्यासाठी चढून येतात (प्र.)

३. माझे बंधू आणि माझे मित्र यांच्याकरिता
''तुझ्यामध्ये शांती वसो'' अशी मी प्रार्थना
करीन. परमेश्वर आमचा देव याच्या
मंदिराकरिता आणि तुझ्या कल्याणासाठी
मी झटत जाईन. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलाने रोमकरांस लिहिलेल्या पत्रातून घेतलेले वाचन १३:११-१४**

**''आपले तारण आता जवळ आले आहे.''**

बंधुजनहो, आता झोपेतून उठावे अशी वेळ आली आहे, कारण आपण विश्वास ठेवला तेव्हापेक्षा तारण आता आपल्या जवळ आले आहे. रात्र सरत जाऊन दिवस जवळ आला आहे म्हणून अंधकाराची कर्मे टाकून द्या आणि प्रकाशाची शस्त्रसामुग्री धारण करा. दिवसाढवळ्या साजेल असे शिष्टाचाराने चाला. चैनबाजीत आणि मद्यपानात, विषय विलासात आणि कामासक्तीत, कलहात आणि मत्सरात राहू नका तर प्रभू येशू ख्रिस्ताला परिधान करा आणि देहवासना तृप्त करण्यासाठी तरतूद करू नका.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

**स्तोत्र ८४:८**

**आलेलुया, आलेलुया!**

हे परमेश्वरा, तुझ्या दयेचा
आम्हांला अनुभव दे.
तू सिध्द केलेले तारण आम्हांला प्रदान कर.
**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २४:३७-४४**

**''प्रभूच्या स्वागतासाठी तयार राहा.''**

येशू आपल्या शिष्यांना म्हणाला : ''नोहाच्या काळात जी परिस्थिती होती तीच मानवपुत्राच्या आगमनाच्यावेळी असेल. त्याकाळी महापूर येण्याअगोदर आणि नोहा गलबतावर चढला त्या दिवसापर्यंत लोक खातपीत होते, लग्न लावून देत होते. महापूर येऊन ते सगळे वाहून

जाईपर्यंत त्यांना काही कळले नाही. मानवपुत्राचे आगमन असेच होईल. शेतात दोघे असतील, त्यातल्या एकाला घेतले जाईल आणि दुसरा मागे ठेवला जाईल. दोघी जात्यावर दळत असतील, त्यातल्या एकीला काढून घेतले जाईल, आणि दुसरी मागे ठेवली जाईल. तेव्हा दक्ष रहा. कारण तुमचा प्रभू कोणत्या दिवशी येणार आहे हे तुम्हांला माहीत नाही. एवढे मात्र लक्षात ठेवा की, चोर रात्री कोणत्यावेळी येणार आहे हे जर घरमालकाला अगोदर कळले तर तो लक्ष ठेवील आणि आपले घर फोडू देणार नाही. तेव्हा तुम्हीदेखील तयारीत रहा, कारण तुम्हांला कल्पना नाही अशावेळी मानवपुत्र येईल.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, प्रभू येशू ख्रिस्ताच्या आगमनाची आम्ही तयारी करीत आहोत. त्याच्या दयेची आपण कळकळीने याचना करू या. दीन जनांना सुवार्ता घोषित करण्यासाठी आणि पश्चात्तापी पाप्याला बरे करण्यासाठी तो या जगात आला. आजच्या जगात त्याने पुन्हा यावे आणि सर्व गरजवंतांना मुक्तिदान द्यावे म्हणून आपण त्याच्याकडे प्रार्थना करू या.

**प्रतिसाद :** हे प्रभू, आमचा मार्ग सरळ कर.

१. आगमनकाळात प्रभू येशूला आपला तारणारा म्हणून स्वीकारण्यास, आपल्या सर्व पापांच्या शृंखलातून बंधमुक्त होण्यास प्रायश्चित्त करावे व आपली अंत:करणे शुध्द करण्यास परमेश्वराची कृपा लाभावी म्हणून प्रार्थना करू या.

२. ख्रिस्त जगाचा प्रकाश. त्याची आज्ञा पाळून ह्या जगात शांतीचे, प्रेमाचे व न्यायाचे राज्य प्रस्थापित करण्यास पोप, बिशप्स, धर्मगुरु व धर्मभगिनी यांना कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करू या.

३. गरीब, आजारी, निराश्रित व निराधार यांना आपल्या दु:खात येशूच्या प्रेमळ स्पर्शाचा, शांतीचा व आनंदाचा अनुभव यावा म्हणून आपण परमेश्वराकडे प्रार्थना करू या.

४. मरीयेने प्रार्थना चिंतन करून प्रभूची वाट पाहिली. आपणसुध्दा बाहेरील गोष्टींपेक्षा आंतरिक गोष्टींकडे जास्त लक्ष देऊन मनन-चिंतन करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतुसाठी प्रार्थना करू या.

## समारोप

हे सर्वसमर्थ आणि नित्यजिवी परमेश्वरा, तुझ्यापासून कोणीही दूर जाऊ नये आणि सर्वांनी आपले तारण प्राप्त करून घ्यावे अशी तुझी मानवजातीकडून अपेक्षा आहे. तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या शांतीने तू जगाला मार्गदर्शन कर आणि मन:स्वास्थ्य व आनंद यांद्वारे तुझ्या ख्रिस्तसभेला तुझी सेवा करू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे स्वर्गीय बापा, तू निर्माण केलेल्या वस्तूंमधूनच ही भाकर व हा द्राक्षरस आम्ही तुला अर्पण करीत आहोत. आमच्या दानांचा स्वीकार कर व ख्रिस्ताच्या समर्पणात आम्हांला सहभागी कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, ख्रिस्तप्रसादाच्या कृपासामर्थ्याने आम्हां सर्वांस स्वर्गाची ओढ लागू दे व स्वर्गप्राप्तीच्या आशेने आमची पावले नेहमी चांगल्या मार्गावर पडू देत. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

आजपासून ख्रिस्तसभा एका नवीन उपासना वर्षात प्रवेश करीत आहे. हा आगमनकाळ दोन टप्प्यात विभागण्यात आलेला आहे: पहिल्या विभागात (आगमनकाळ : पहिला रविवार ते १६ डिसेंबर) येशूच्या पुनरागमनाच्या तयारीकडे ख्रिस्तसभा भाविकांचे लक्ष वेधते. दुसऱ्या विभागात (१७ डिसेंबर ते २४ डिसेंबर) ती येशूच्या पहिल्या आगमनाची स्मृती साजरी करते. आजची वचने प्रभूच्या पुनरागमनासाठी आपण तीन प्रकारची उलथापालथ करावी असा विचार मांडतात:

**अ) हिंसात्मक प्रवृत्तीकडून शांतीकडे :** यशया संदेष्ट्याने ज्या काळात संदेश दिला (इ.स. पू. ७४१ ते ७०१) तो काळ राजकीय धामधुमीचा होता. शेजारी असलेले असिरिया राष्ट्र इस्राएलवर हल्ला करण्याच्या तयारीत होते. अशा पार्श्वभूमीवर आजचे पहिले वाचन (यशया २:१-५) दोन परस्परविरोधी प्रतिमा आपल्यासमोर उभी करते. युध्दाचे प्रतीक असलेली राष्ट्रे आणि शांतीचे प्रतीक असलेले जेरूसलेम. भाविकांनी हिंसेकडून शांतीच्या दिशेने वाटचाल सुरू करावी असे त्यात सूचित करण्यात आलेले आहे.

**ब) अंधारातून प्रकाशाकडे :** रोमचे ख्रिस्ती लोक छळाच्या भीतीने पुन्हा एकदा आपल्या पूर्वायुष्याकडे वळण्याच्या विचारात होते. आजच्या दुसऱ्या वाचनात (रोम.१३:११-१४) संत पौल दिवस व रात्र, अंधार व प्रकाश या प्रतिमा वापरून त्यांना पापी जीवनाकडून नीतिमान जीवनाकडे येण्याचे आवाहन करतो.

**क) निष्काळजीपणाकडून सतर्कपणाकडे :** आजच्या शुभवर्तमानात संत मत्तय (२४:३७-४४) दोन प्रतिमा वापरतो : शेतात काम करणारे दोन पुरुष आणि घरी दळण करणाऱ्या दोन स्त्रिया. त्यापैकी प्रत्येक एक वर घेतला/ घेतली जाईल आणि एक मागे ठेवला/ली जाईल. ह्याचा अर्थ प्रभूच्या आगमनसमर्थ पन्नास टक्के लोक बेफिकीर व पन्नास टक्के लोक जागृत असणार आहेत. आगमनकाळात आपण निष्काळजीपूर्वक सतर्कपणाकडे वाटचाल करावी अशी अपेक्षा आहे.

**आत्मपरीक्षण :** प्रभूचे स्वागत करण्यासाठी माझ्या जीवनात कोणकोणत्या प्रकारची उलथापालथ करणे आवश्यक व अपेक्षित आहे?

●●●

| नोव्हेंबर/डिसेंबर २०२२ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २८ सं. कॅथरीन लेबोरे (जां) | : यशया २:१-५/मत्तय ८:५-११,१३ | |
| मंगळ २९ सं. ह्यूबर्ट (जां) | : यशया ११:१-१०/लूक १०:२१-२४ | |
| बुध ३० सं ॲण्ड्र्यू (प्रेषित) (तां) | : रोम.१०:९-१८/मत्तय ४:१८-२२ | |
| गुरु ०१ सं एलिजियुस (एलोई) | : यशया २६:१-६/मत्तय ७ :२१,२४-२७ | |
| शुक्र ०२ सं बिबियाना | : यशया २९:१७-२४/मत्तय ९:२७-३१ | |
| शनि ०३ सं. फ्रान्सिस झेवियर | : यशया ३०:१९-२६/मत्तय ९:३५-१०:१,६-८ | |